पुढारी

# अखेर मालमत्ता कराच्या वसुलीसाठी आयुक्तांच्या हस्ते पॉज मशीन कार्यान्वित

## कर विभागाला मिळणार थकबाकीदारांची अचूक माहिती

भाईंदर : पुढारी वृत्तसेवा

मिरा-भाईंदर शहरातील मालमत्ता धारकांना मालमत्ता कर भरणे सुलभ तसेच हा कर डिजिटल पेमेंटद्वारे भरता यावा, यासाठी आयुक्त संजय काटकर यांच्या हस्ते २३ पॉज मशीन कार्यान्वित करण्यात आल्या आहेत. यामुळे कर विभागाला थकबाकीदारांची अचूक माहिती मिळणार आहे.

या मशीन बँक ऑफ बडोदाच्या विशेष निधीतून पालिकेला मोफत देण्यात आल्या असून या मशीनद्वारे मालमत्ता धारकांना डेबिट, क्रेडिट कार्डसह क्यूआर कोडद्वारे कराचा भरणा करता येणार आहे. त्याचे वृत्त दैनिक पुढारीने ४ जुलै रोजीच प्रसिद्ध केले होते.

पालिका आयुक्तांनी मालमत्ता कर वसुलीसाठी ठोस पावले उचलली असून यापुढे करदात्यांना कर भरल्याची पावती न मिळाल्यास वा त्यांच्याकडील पावती गहाळ झाल्यास त्यांना ही पावती ऑनलाईन उपलब्ध करून देण्यास सुरुवात केली आहे. तसेच पोज मशीनद्वारे कर भरल्यास तात्काळ कर भरल्याची पावती उपलब्ध होणार आहे. ज्या मालमत्ताधारकांकडे कराची रक्कम थकीत आहे, असे मालमत्ताधारक कर भरण्यास पालिका कार्यालयात येऊ शकत नाहीत त्यांच्या घरी जाऊन कर वसुली पथक पॉज मशीनद्वारे कर वसुली करणार आहे. पालिकेच्या उत्पन्नाचे प्रमुख स्रोत असलेल्या मालमत्ता कराच्या वसुलीसाठी आयुक्तांनी विविध मोहिमा राबवून यंदा १०० टक्के कर वसुलीचे उद्दिष्ट कर विभागाला दिले आहे. यानुसार कर विभागाने कराच्या वसुलीसाठी थकबाकीदारांच्या घरोघरी जाऊन कर वसुली सुरू केली आहे.

कर विभागाने १ एप्रिलपासून आत्तापर्यंतसुमारे १२९ कोटी ८३ लाख २७ हजार ५७५ रुपये इतकी कर वसुली केली असून ही वसुली गतवर्षीपेक्षा २० कोटींनी अधिक असल्याचे सांगण्यात येत आहे. यातील सुमारे ५० कोटींची वसुली ऑनलाईनद्वारे करण्यात आली आहे. मात्र उर्वरीत कर वसुलीसाठी पालिकेने आपल्या संकेतस्थळासह मोबाईल ॲप अद्यावत केले आहे.

### घरी जाऊन थकबाकी वसुली

कर विभागाला दैनंदिन कर वसुलीची आकडेवारी व थकबाकीदारांची माहिती सिटीझन व मॅनेजमेंट ॲपद्वारे उपलब्ध करून देण्यात येत असून जेणेकरून कर विभागाला थकबाकीदारांची अचूक माहिती मिळणार आहे. मिळालेल्या माहितीच्या आधारे कर विभागाचे वसुली पथक थकबाकीदारांच्या घरी जाऊन थकीत कराची पॉज मशीनद्वारे वसुली करणार आहे. या वसुलीसाठी पथक प्रमुखांकडे पॉज व क्युआर कोड मशीन देण्यात येणार आहे. ज्यांना क्रेडिट, डेबिट कार्डद्वारे कर भरायचा असल्यास त्यांना पॉज मशीनद्वारे कर भरता येणार आहे. मात्र ज्यांना क्यूआर कोड स्कॅन करून कर भरायचा आहे त्यांना क्यूआर कोड मशीनद्वारे कर भरता येणार आहे. याद्वारे कर भरणाऱ्यांना तात्काळ पावती दिली जाणार असून त्यांना हिच पावती त्यांच्या ई-मेलसह पालिकेच्या संकेतस्थळ व मोबाईल ॲपवर उपलब्ध येणार आहे. यामुळे करदात्यांना कर भरल्याच्या पावतीची प्रिंट पाहिजे तेव्हा काढता येणार आहे.

Palghar Edition
Nov 23, 2023 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

# Twin-city gets 23 PoS machines for collection of property tax



SURESH GOLANI / MIRA-BHAYANDAR

## Daunting task ahead

One of the major sources of revenue generation, property tax collections contribute a lion's share in the annual budgets. Although collections amounting Rs280 crore had been projected for the current fiscal, the MBMC anticipates Rs232 crore owing to the presence of double and ghost entries in the tax registry. With just Rs129 crore in its property tax kitty, the MBMC stares at a daunting task of recovering Rs103 crore in the remaining four months. The MBMC is expected to run short of manpower if elections are declared early next year.

## Recovery staff on radar

After scanning records of major defaulters in the six civic wards, tax department has been warned of strict action in case of negligence and carelessness towards recovery of tax. "While notices have been issued to some officers, nine clerks attached to the tax department have been shunted out. Meanwhile a list of major defaulters has been prepared and these taxpayers will be asked to clear the dues or else legal action will be initiated against them," said deputy civic chief (tax) Sanjay Shinde. The assessed number of properties in the twin city is currently pegged at around 4,00,607 including 64, 618 commercial and 3,35,989 residential units.

Struggling to augment its property tax recovery figures, the Mira Bhayandar Municipal Corporation (MBMC) has equipped its tax department with 23 Point of Sale (PoS) machines to enable citizens of the twin-city to easily pay property taxes at their doorstep.

The machines were handed over by civic chief Sanjay Katkar to the tax officials on Wednesday. Provided free-of-cost by Bank of Baroda, the PoS machines have been linked with the main data server of the MBMC and payments made by citizens will be reflected instantly.

Once they make the payments, the taxpayers will get receipts generated through these machines, and they will also receive messages on their registered mobile numbers with links to download the receipts. The civic administration has also updated its system to incorporate the collection feature in its existing software. Property holders can not only swipe their credit/debit cards or use the dy-

over, outstanding can be generated by entering the name of the property holder whose name appears in the property tax bills.

Earlier, the bills could be generated only after entering the unique identification number of the property. After registering a remarkable feat

ery process has started losing steam after the end of the early bird scheme (EBS), rolled out by MBMC, which played a significant role in the surge in collections. While the collections have been limited to around Rs27 crore in the past three months, the total recovery hovered above Rs1